# योजना

### 1. आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) दारिद्रय रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना तसेच अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील

#### शेतकऱ्यांना, शेतीसाठी अर्थ सहाय्य देण्याची योजना

आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) दारिद्रय रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना तसेच अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना शेतीसाठी अथसर्हाय्य देण्याची योजना सन २०१६-१७ मध्ये या योजनांच्या शासन निणयानुर्सार राबविण्यात येणार असून सदर योजना अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांच्या मागणी नुसार जमिन सुधारणा, निविष्ठा वाटप, सुधारीत अवजारे, बैलजोडी, बैलगाडी, जुनीविहीर दुरूस्ती, इनवेल बोअरींग, पाईपलाईन, पंपसंच, नविन विहीर, शेततळे, परसबाग, ठिबक/तुषार सिंचन, व इतर बाबींचा लाभ देय आहे.

### 2. गुणनियंत्रण कामकाज :-

कृषि निविष्ठा (बियाणे, खते, किटकनाशके) यांना जिल्हयात विक्रीसाठी परवाना देणे. अधिक माहितीसाठी कृषि विभाग वेबसाईट www.mahaagri.gov.in वर निविष्ठा व गुणनियंत्रण विभागास भेट देणे.

### 3. बायोगॅस बांधणीकरीता अनुदान देणे

राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना अंतर्गत बायोगॅस उभारणी करीता केंद्र शासनाच्या अनुदान देण्यात येते. सवसार्धारण गटासाठी - रू. 9,000/- प्रति संयत्र अनुसूचित जाती व जमाती - रु. 11,000/- प्रति संयत्र शौचालय जोडणी केल्यास - - रु. 1,200/- प्रति संयत्र. अधिक माहिती करीता जिल्हा स्तरावर - कृषी विकास अधिकारी व तालुका स्तरावर - गट विकास अधिकारी/ कृषी अधिकारी /विस्तार अधिकारी(कृषि) यांच्याकडे संपर्क साधावा.

### 4. जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत महत्वाच्या योजना.

•५०% अनुदानाने शेतक-यांना पीक संरक्षण अवजारे पुरवठा
•५०% अनुदानाने शेतक-यांना सुधारित कृषि अवजारे पुरवठा
•बचत गटांना ५०% व ९०% अनुदानाने शेती व्यवसायास चालना देणे.
•ताडपत्री पुरवठा
•५०% अनुदानाने स्वयंचलित कापणी व मळणी यंत्रे अनुदानाने पुरवठा करणे
•५० % अनुदानाने शेतीसाठी पंपसंचाचा अनुदानाने पुरवठा करणे
•शेतक-यांना ५० % अनुदानाने बियाणे संच पुरवठा करणे
•अपंग शेतक-यांना 90% अनुदानाने कृषि साहित्याचा पुरवठा करणे
•शेतक-यांना ५० % अनुदानाने विद्युत पंपसंचाचा पुरवठा करणे
•बायोगॅस बांधणीकरीता पुरक अनुदान देणे

वरील सर्व जिल्हा परिषद सेस फंडा अंतर्गत असलेल्या योजनांन करीता पात्र लाभार्थी ठरवणेची जबाबदारी गटस्तरावरील कृषि विस्तार यंत्रणेची राहील. प्रथम येणा-या शेतक-यांना प्रथम प्राधान्य देणेत येईल. सदर योजना सवसार्धारण व सर्व घटकातील शेतक-यांसाठी आहेत.